दिनांक- १६/०४/२०२५

## - : प्रेस नोट :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. २५/२०१६, कलम- ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र. अधिनियम १९८८
विशेष खटला क्र. ७५/२०१७

आरोपी - १) श्री. लक्ष्मण धनु पवार, भाडे संकलक, एफ पुर्व, माटुंगा विभाग, मनपा, मुंबई
यांनी लाच स्विकारल्या प्रकरणी ३ वर्षे कारावास व रू. २५,०००/- दंडाची शिक्षा

लोकसेवक लक्ष्मण धनु पवार, भाडे संकलक, एफ पुर्व, माटुंगा विभाग, मुंबई यांनी लोकसेवक पदाच्या नात्याने काम करताना यातील फिर्यादी श्री. सुरेश मारीमुत्तु यांचेकडे त्यांचे आईचे नावे असलेली खोली फिर्यादी यांचे नावे करण्याकरीता रू. २०,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच दयायची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १८/०४/२०१६ रोजी ला.प्र.वि., मुंबई विभाग येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार केली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०४/२०१६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या प्रलंबीत कामाकरीता रू. २०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून कायदेशीर पारिश्रमाखेरीज पारितोषिक म्हणून रु. १०,०००/- लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून लोकसेवक यांच्याविरूध्द ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन दिनांक १९/०४/२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त नमूद आरोपी यांचेविरूध्द विशेष खटला क्र. ७५/२०१७ अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी विरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक १६/०४/२०२५ रोजी मा. न्यायालयाने नमुद आरोपीस ३ वर्षे कारावास व रू. २५,०००/- द्रव्यदंड शिक्षा सुनावली.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. राजु चव्हाण, पोलीस निरीक्षक श्री. दिपक बर्गे व पोलीस निरीक्षक श्री. अविनाश कवठेकर यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. प्रभाकर तरंगे यांनी काम पाहिले.

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net